मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ३४ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● जून १९९८

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## तुम्ही काय निकाल द्याल?

एक गुरु-शिष्यांची जोडी आहे. त्यांच्यामध्ये असा करार झाला होता की, गुरूने शिष्यास कायद्याचे ज्ञान शिकवायचे. जेव्हा शिष्य कोर्टात पहिला कज्जा जिंकील तेव्हा शिष्याने गुरूची फी द्यावयाची.

गुरूने शिष्याला कायद्याचे ज्ञान शिकवले. शिष्य काही गुरूची फी देईना. आपली फी मिळवण्यासाठी गुरूने शिष्यावर कोर्टात दावा लावला.

गुरूचे म्हणणे निकाल काहीही लागला तरी जय माझाच. माझी फी दिली पाहिजे असे न्यायाधीशांना वाटले तर मी जिंकलो व फी देऊ नये असे वाटल्यास त्याचा अर्थ शिष्य पहिला कज्जा जिंकला व त्यास मूळ कराराप्रमाणे माझी फी देणे क्रमप्राप्त आहे. म्हणजे मी परत जिंकतोच.

शिष्याचे म्हणणेही तसेच आहे की निकाल काहीही लागला तरी जय माझा. मी फी देण्यास बांधलेला नाही असे वाटल्यास जय माझा व मी फी दिली पाहिजे असे वाटल्यास मी अजून पहिला कज्जा जिंकलेला नाही व कराराप्रमाणे मी फी देण्यास ➔ बांधलेला नाही.

तुम्ही काय निकाल द्याल?

- प्रतिष्ठानचे अध्यक्ष **सुरेश सखाराम** (पृ.३९९) मुंबई

**(तुमचा निकाल ३१ जुलै १९९८ पर्यंत संपादक, 'हितगुज' यांचेकडे पाठवावा.)**

## आदर्श मातेचे मनोगत



**राधाबाई बा. मराठे**

माननीय श्री रा. रा. ग. वि. मराठे यांना स. सा. नमस्कार,

आपल्या पूजनीय मातोश्रींच्या स्मरणार्थ 'आदर्श माता' ह्या पुरस्कारासाठी आपण सर्वांनी एकमताने माझी निवड करून गौरविले व सन्मानित केलेत त्याबद्दल मी आभारी आहे.

परिस्थितीवर मात करून संकट समयी खंबीरपणे सारासार विचार करून योग्य निर्णय घेण्याचे संस्कार आईकडून मला मिळाल्यामुळे सामाजिक बांधिलकी सांभाळून सर्व तऱ्हेच्या संकटांना तोंड देऊ शकले.

देवावर दृढ श्रद्धा असावी. निरपेक्षपणे कर्तव्य करीत राहिल्यास जनता जनार्दनरूपी देवच आपल्या पाठीशी उभा राहून आधार देतो.

स्वतःचे दुःख विसरून दुसऱ्याच्या दुःखात मदतीचा हात दिल्यास त्यातून आपल्यास निर्भेळ आनंद मिळतो. हे माझ्या अनुभवातून मला कळले.

''स्वाभिमान असावा पण अहंकार नसावा.'' आपण दिलेला पुरस्कार व सन्मान बहुमोलाचा आहे. हा सन्मान ज्या परमपूज्य मातेच्या स्मरणार्थ मिळाला त्या मातेचे स्मरण करून त्यांना वंदन करते. तसेच आपणा सर्वांस अभिवादन करून माझे मनोगत संपविते.

मराठे प्रतिष्ठानने जे उपक्रम सुरू केले आहेत ते पूर्णत्वास जावे. तसेच आपल्या कार्याची भरभराट होवो. आपणा सर्वांना सुख शांती व आयु आरोग्य लाभो, अशी ईश्वरापाशी प्रार्थना करते.

आपली स्नेहांकित भगिनी

धारबांदोडा, गोवा — **राधाबाई बा. मराठे**

दि. १४.५.१९९८ — (पृ. ५४१)

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

### कार्यकारी मंडळ

दर महिन्याच्या दुसऱ्या (व गरजेनुसार चौथ्या) शनिवारी कार्यकारी मंडळाच्या सभा होतात. या वेळी कोणीही कुलबांधव प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी सायं. ५ वाजता येऊ शकतो.

मागील तिमाहीत मार्च १४ व २७, एप्रिल ११ व २२ आणि मे ९ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या.

१४ मार्च च्या सभेत माधव नारायण, माजी कोषाध्यक्ष यांनी अंतर्गत हिशेब तपासनीस म्हणून १९९७-९८ चे हिशेब तपासावे असे ठरविण्यांत आले.

२७ मार्च च्या सभेत प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या गुणवत्ता पारितोषिकांच्या वितरण समारंभाला गुणवान विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी असते याबद्दल चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की मुंबई व उपनगरातील विद्यार्थ्यांनी स्वतः अथवा त्यांच्या पालकांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी पारितोषिक वितरणाचे वेळी अथवा त्यानंतर प्रतिष्ठानच्या कार्यालयातून पारितोषिकाची रक्कम नेण्याची व्यवस्था करावी.

याच सभेत सुरेशभाऊ मराठे यांनी प्रतिष्ठानसाठी अद्ययावत सुशोभित स्वतंत्र खोली व फर्निचरचा वापर करण्याची व्यवस्था करून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. (आजवर सुरेशभाऊंची खोली हेच प्रतिष्ठानचे कार्यालय असे समीकरण होते.)

११ एप्रिल च्या सभेत २०.९.९८ रोजी वार्षिक सभा घेण्याचे व त्याबाबतचे निमंत्रण २८.८.९८ पूर्वी रवाना व्हावे असे ठरविण्यात आले.

### हितगुज

मार्च १९९८ च्या अंकापासून हितगुज पाने १६च पण मोठ्या आकाराची देण्यास सुरवात केली आहे. यामुळे जास्त मजकूर देता येतो. कुलबांधवांचे साहित्य अधिक प्रमाणात प्रसिद्ध करणे यामुळे शक्य होणार आहे. अनेक वाचकांनी या बदलाचे स्वागत केले आहे. वर्गणीदार संख्याही हळुहळु वाढत आहे.

### वसंत-गौरव १६ मे १९९८

प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य 'वा.ग.' व सौ. वृषाली मराठे यांनी त्यांच्या विवाहाच्या रौप्य महोत्सवानिमित्त प्रतिष्ठानच्या माध्यमातून १६ मे १९९८ रोजी एक शब्द व सुरांचा समारोह आयोजित केला होता. त्याचा वृतांत याच अंकात स्वतंत्रपणे छापला आहे.

***

## विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनियरिंग शिक्षणासाठी अर्थसहाय्य

ठाणे येथील कुलबांधव श्री. नारायण वामन (पृ. ६९८) व त्यांच्या पत्नी सौ. विजयालक्ष्मी खांबेटे यांनी पुत्र विनय याच्या स्मृती निमित्ताने प्रतिष्ठानकडे ठेवलेल्या ठेवीतून कुलबांधवांना मेडिकल अथवा इंजिनिअरिंग शिक्षणासाठी रु. ३०,००० पर्यंत बिनव्याजी कर्ज मिळू शकेल. आपली माहिती देऊन प्रतिष्ठानकडे याबाबत अधिक चौकशी करावी.

## कु. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिके

इ. १०वी, १२वी, मिडल् स्कूल व हायस्कूल स्कॉलरशिप या प्रत्येक परीक्षेत मराठे कुलबांधवांपैकी सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला **प्रत्येकी रु. २५१** चे **कु. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक** देण्यात यावयाचे आहे. १९९७-९८ मध्ये वरील परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी आपली माहिती **१५ ऑगस्ट १९९८ पर्यंत** आवश्यक कागदपत्रांसह कार्यवाह, 'मराठे प्रतिष्ठान' यांजकडे पाठवावी.

## गरजवंतांना मदतीचा हात
## गुणवंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप

कपिगोत्री मराठे परिवारांतील मराठे, विद्वांस, खांबेटे, चक्रदेव, जोशी, जाईल, फडणीस व रटाटे आडनावाच्या **गरजवंत विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानच्या शिक्षणनिधीतून मदत** दिली जाते. गरजूंनी संकोच न बाळगता याबाबत प्रतिष्ठानकडे पत्तव्यवहार करावा.

तसेच निरनिराळ्या परीक्षांत यशस्वी होणाऱ्या **विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानतर्फे प्रोत्साहन म्हणून खालीलप्रमाणे गुणवत्ता पारितोषिके** दिली जातात.

| | |
|---|---|
| **१. इ. १०वी** | : ७०% - रु. १५१, ८५% - रु. २५१ |
| **२. इ. १२वी** | : ६०% - रु. १५१, ८०% - रु. २५१ |
| **३. पदविका/पदवी** | : प्रथमवर्ग - रु. २००, ७०% - रु. २५१ |
| **४. पदव्युत्तर परीक्षा** | : विशेष प्राविण्य रु. २५१ |
| **५. अन्य अभ्यासेतर उपक्रम** | : किमान राज्य पातळीवरील स्पर्धा अथवा परीक्षांत विशेष प्राविण्य रु. २५१ |

**आपल्या घरातल्या, शेजारच्या अथवा माहितीतल्या मराठे परिवारांतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची माहिती १५ ऑगस्ट १९९८ पूर्वी** आवश्यक कागदपत्रांसह, मराठे प्रतिष्ठानकडे पाठवावी.




Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

## मानसन्मान

**ॲथलेटिक चँपियन हरि कृष्ण**



ज्येष्ठ नागरिकांची अखिल भारतीय पातळीवरील २० वी ॲथलेटिक चँपियनशिप स्पर्धा ठाणे येथे दि. १६ ते १९ एप्रिल १९९८ रोजी झाली. कर्नाटक राज्याच्या वतीने या स्पर्धांत भाग घेऊन **बेळगाव येथील प्रतिष्ठानचे सभासद हरि कृष्ण** (पृ.४२७) यांनी ७० वर्षावरील गटात खालीलप्रमाणे दोन बक्षिसे मिळवली.

१. भाला फेक - २ रा क्रमांक - सिल्व्हर मेडल
२. थाळी फेक - ३ रा क्रमांक - ब्राँझ मेडल

गेली ४-५ वर्षे हरि कृष्ण या स्पर्धेत सातत्याने बक्षिसे मिळवतात. मराठे परिवारातर्फे अभिनंदन!

**उत्कृष्ट जाहिरात संदेशक - गजानन भास्कर**

गुढी पाडव्यानिमित्त मुंबईच्या महाराष्ट्र टाईम्स या दैनिकातर्फे एक विशेष जाहिरात संदेश स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत प्रतिष्ठानचे **घाटकोपर येथील सभासद गजानन भास्कर** (पृ.४२७) यांनी त्यांचे नातू अभिजित व अनिकेत यांना दिलेल्या संदेशाला २ रे बक्षीस मिळाले. अभिनंदन!

**कीर्तन शिरोमणी - सुंदरबुवा मराठे**

रायगड जिल्ह्यातील पाली, सुधागड येथील **कुलबांधव सुंदर (बाळकृष्ण) विष्णु** (पृ.१७०) ऊर्फ सुंदरबुवा मराठे (जन्म १९१३), प्रसिद्ध नारदीय कीर्तनकार यांचा १६.१.१९९८ रोजी साहित्य संघ मंदिर, गिरगांव, मुंबई येथे 'परमार्थसाधना' तर्फे सत्कार करण्यात आला. त्यांनी आतापर्यंत एकूण १८४०१ कीर्तने केली आहेत. विशेष म्हणजे प्रत्येक कीर्तनाची नोंद (तारीख, वार, पूर्वरंग, आख्यान, गाव) व्यवस्थित ठेवली आहे. त्यांना यापूर्वी १४.१.८६ रोजी सांगली येथे 'कीर्तन शिरोमणि' आणि ६.४.८६ रोजी कोल्हापूर येथे 'कीर्तन सिद्ध' अशा पदव्या मिळाल्या आहेत. खडा आवाज व दाणेदार तान यामुळे या वयातही त्यांचे कीर्तन म्हणजे संगीताची मेजवानीच असते.

**शाब्बास राधिका**

मुलुंड, मुंबई येथील **सभासद महेश अनंत** (पृ.५४८) **यांची मुलगी राधिका**, मुलुंड (पूर्व), मुंबई येथील लोकमान्य प्राथमिक विद्यालयाची विद्यार्थिनी, हिचा १ ली च्या वार्षिक परीक्षेत (मार्च १९९८) सर्व तुकड्यांत १ ला क्रमांक आला. राधिकाचे अभिनंदन!

## नांदा सौख्यभरे

१. **खोतोडे, गोवा येथील सभासद लक्ष्मण पांडुरंग (पृ.५४३) यांची मुलगी प्रतिभा** हिचा विवाह गजानन विठ्ठल बोरकर, बेतोडा यांचा मुलगा मुकुंद याच्याशी दि. २१.४.१९९८ रोजी संपन्न झाला.

२. **डोंबिवली, जि. ठाणे येथील सभासद अरविंद दामोदर** (पृ.२९२), प्रतिष्ठानचे विश्वस्त, **यांचा मुलगा अभिजित** याचा विवाह श्री. विलास ढोले यांची मुलगी ऋता हिच्याशी दि. ६.५.१९९८ रोजी संपन्न झाला.

३. **दादर येथील प्रतिष्ठानचे सभासद सुधाकर नरहर (पृ.४६) यांचा मुलगा सचिन उर्फ उमेश** याचा विवाह विद्याधर गणेश जोशी, गणेशगुळे, ता. जि. रत्नागिरी यांची मुलगी रेवती हिच्याशी दि. ७.५.१९९८ रोजी झाला.

४. **ढवळी, गोवा येथील सभासद कालिदास बाळकृष्ण (पृ. ५४१) यांची मुलगी कांचन** हिचा शुभविवाह अनंत तुकाराम कार्लेकर, वानिवडे, ता. देवगड, जि. रत्नागिरी यांचा मुलगा गुरुनाथ याच्याशी दि. २३.५.१९९८ रोजी संपन्न झाला.

५. **बेळगाव येथील सभासद रामचंद्र यशवंत (पृ.५२५) यांची मुलगी वैशाली** हिचा शुभविवाह यशवंत विनायकराव कानडे, धारवाड यांचा मुलगा विश्वास याच्याशी दि. २३.५.१९९८ रोजी झाला.

६. हेदुलवाडी, ता. मळेवाड, जि. सिंधुदुर्ग येथील **कुलबांधव रमाकांत सदाशिव** (पृ.४४९) **यांची कन्या तारामती उर्फ मनीषा** हिचा विवाह मधुकर केशव गोगटे, काळसेवाडी यांचा मुलगा भरत उर्फ बंडू याच्याशी दि. १२.२.१९९८ रोजी झाला.

***(मागील मार्च १९९८ अंकांत 'भरत' हे नाव छापायचे नजरचुकीने राहिले होते. त्याबद्दल दिलगीर आहो. - संपादक)***

**सर्व नवविवाहित वधूवरांस मराठे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक शुभेच्छा!**

## सहवेदना

१. **बोरिवली, मुंबई येथील सभासद रामचंद्र पुरुषोत्तम जोशी (पृ.७४७) यांच्या खालील कुटुंबीयांच्या** निधनाचे वृत्त कळले आहे.

बहीण सुशीला विनायक गोडबोले (दि. २३.५.१९९७), वडील बंधु केशव पुरुषोत्तम (दि. २८.९.१९९७), धाकटे बंधु पांडुरंग पुरुषोत्तम (दि. ३.२.१९९८) आणि कनिष्ठ पुत्र शरद रामचंद्र, जन्म १९५६ (दि. २५.३.१९९८)

२. **सांब्रा, बेळगांव येथील सभासद श्रीधर कृष्णाजी यांचे ज्येष्ठ बंधु महादेव कृष्णाजी** (पृ.५३५) यांना शिरगांव (चिकोडी) येथे ७.४.१९९८ रोजी देवाज्ञा झाली.

३. **मुंबई येथील कुलबांधव तुकाराम पांडुरंग** (पृ.१९) यांचे १६.५.१९९८ रोजी निधन झाले.

**वरील सर्वांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

***

Marathe Pratishthan

# वसंत गौरव - ऋतु उत्सव

**- वि. के. मराठे (पृ.२०)**, वरळी, मुंबई.

मराठे प्रतिष्ठानतर्फे या वर्षी शनिवार दि. १६ मे १९९८ रोजी सायंकाळी मराठे उद्योग भवन, प्रभादेवी येथे हा ऋतुउत्सव साजरा झाला.

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे प्रतिष्ठानचे संस्थापक सभासद **श्री. वा. ग. मराठे** (पृ.५०३) **व सौ. वृषाली मराठे** यांनी त्यांच्या विवाहाच्या २५व्या वाढदिवसानिमित्त या कार्यक्रमाचे यजमानपद स्वीकारले होते.

प्रतिष्ठानचे कार्यवाह **श्री. वि. के. मराठे** (पृ.२०) यांनी उपस्थितांचे स्वागत करून या उपक्रमाचे वैशिष्ट्य सांगितले व कार्यक्रमाच्या संचालनाची सूत्रे सौ. मंजिरी मराठे (पृ. ३९२) यांचेकडे सुपूर्द केली.

**सौ. मंजिरी मराठे** यांनी या कार्यक्रमाचे अतिशय सुंदर तऱ्हेने व सहजत्या संचालन केले. वास्तविक त्यांना अगदी आयत्या वेळी ही कामगिरी देण्यात आली. कलावंतांची यादी सुद्धा अगदी शेवटच्या क्षणी देण्यात आली. पण त्यांच्या निवेदनातील सहजता पाहता खरोखरच त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांची तयारी करवून घेणारे सर्वांचे आवडते **श्री. शेखर खांबेटे** (पृ.७०५) यांनी या कार्यक्रमाची मेहनत घेऊन आखणी केली होती.

**सौ. विद्या जाईल** (पृ. ७५७) व **कु. संध्या खांबेटे** (पृ. ६९६) यांच्या सुमधुर ईशस्तवनाने संगीत कार्यक्रमाला सुरवात झाली.

त्यानंतर **सौ. विद्या जाईल यांनी एक भक्तीगीत आणि एक नाट्यगीत** (गजानन नाम तुझे नीज धाम व सोऽहं हर डमरु बाजे) सादर केले व वातवरण धुंद झाले.

भक्ती व नाट्यगीतानंतर **कु. संध्या खांबेटे यांनी गझल गायन पसंत केले**. 'युँ



सजा चाँद' व 'रस्म-ए-उल्फत' या दोन भावगंभीर गझला त्यांनी तितक्याच नाजूक आवाजात सादर करून एक तरल वातावरण निर्माण केले.

**कु. चंद्रप्रभा खांबेटे** (पृ.७०५) (कै. वा. गो. यांची नात) यांनी 'ऐरणीच्या देवा' हे सिनेगीत सादर केले. पण लगेचच त्या गझल गायनाकडे वळल्या. 'आप की नजरोंने समझा' ही गझल त्यांनी हळुवारपणे सादर केली.

**सौ. स्वाती हेमंत** (पृ. ३२१) सुद्धा गझलांच्या प्रेमात पडल्या. त्यांनी 'आज जानेकी जिद ना करो' व 'बरसात की भीगी रातोंमें' या दोन नितांत सुंदर गझला तितक्याच समजुतीने सादर केल्या. गझल गाताना, छे! तिचे रेशमी पदर उलगडताना जी नजाकत लागते, जी समज लागते, तिचं दर्शन या कलावंतांच्या ठिकाणी वारंवार दिसत होतं. थोडक्यात 'अर्थामागुनी शब्द आणि शब्दामागुनी अर्थ' असा पाठशिवणीचा नाजूक खेळ चालला होता. रसिक श्वास रोखून सूर झेलत होते. अर्थ शोधीत होते. वसंत समयी अशी मैफल रंगावी हा विलक्षण योगायोग म्हणावा लागेल. क्षणभर मनात आलं, या गझलप्रेमींना व्यासपीठावर बसवावं आणि परंपरेनुसार एकेकासमोर शमादान ठेवावं व त्या कलावंतांनी एकाहून एक मस्त गझला सादर कराव्या.

**कु. दिपाली दामले** (कार्यक्रमाच्या यजमान सौ. वृषाली यांची भाची) या १० वीतल्या मुलीने कॅसियोवर 'मेरा नाम जोकर' या राज कपूरच्या

**कार्यक्रमाचे यजमान वा. ग. व सौ. वृषाली यांचा सत्कार - अनुक्रमे सुरेशभाऊ व सौ. सुलभाताई यांच्या हस्ते**



सिनेमातील गीते वाजवून रसिकांची वाहवा मिळवली.

त्यानंतर मध्यंतरात प्रतिष्ठानचे **अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे यांनी प्रसंगोचित भाषण केले व श्री. वा. ग. व सौ. वृषाली मराठे या दांपत्याचा सत्कार केला.** अध्यक्षांच्या हस्ते शाल व श्रीफळ विनयपूर्वक स्वीकारताना यजमान दांपत्याने आपली कृतज्ञता थोडक्या शब्दांत व्यक्त केली. कारण भावनांच्या आवेगात शब्द कुठच्या कुठे उडून जातात, नाहीतर दातांच्या कडीकुलपात चिपचाप बसतात.

श्री. सुरेशभाऊ मराठे यांनी **प्रत्येक कलाकाराचाहि स्टेजवर बोलावून सत्कार केला.**

या सुमारास अल्पोपहाराच्या बशा रसिकांच्या हाती पडत होत्या आणि रसिक कार्यक्रमाचा 'पोट'भर आस्वाद घेत होते.

त्यानंतर **सौ. मंजिरी मराठे** यांनी **श्री. व. पु. काळे यांची एक कथा हळुवारपणे** त्यातील प्रत्येक प्रसंग रंगवीत सादर केली.

**कु. सुषमा ढमढेरे** (सौ. विद्या जाईल यांच्या शिष्या) आणि **कु. अंजली विवेक मराठे** (पृ.४४०) यांनी गीते सादर केल्यानंतर सर्वांच्या परिचित **सौ. सुलभा सुरेंद्रनाथ** (पृ.२८४) यांनी एक लहानसा प्रसंग अगदी खुलवून सांगितला. कोणतीही पूर्वसूचना नसताना अगदी आयत्यावेळी



Marathe Pratishthan

सौ. सुलभाताईंनी प्रतिष्ठानवरील प्रेमापोटी या मैफलीत आपलाही सहभाग असावा या भावनेने हा एक प्रसंग शब्दबद्ध केला.

**सौ. राधा श्रीकांत** (पृ. ३७८) या कुलभगिनीनेही मोठ्या हौसेने पारंपरिक लाकुडतोड्याची कथा विडंबनात्मक पद्धतीने सादर करून श्रोत्यांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

मैफल मावळतीकडे झुकू लागली. **समारंभाचे मुख्य आकर्षण श्री. गणेश जाईल** (पृ. ७५७) साथीदारांसह स्टेजवर स्थानापन्न झाले. रसिक सावरून बसले. पट्टीचा फलंदाज खेळपट्टीवर आल्यावर स्टेडीयममध्ये जे वातावरण निर्माण होते तोच प्रकार झाला. तबला पेटीचे सूर जुळले. बुवांचे स्वर त्यात मिळून एक त्रिवेणी संगम झाला. बुवांनी खणखणीत आवाजात 'हेचि पुरुष दैवाचे', 'मर्मबंधातली ठेव ही', 'नाथ हा माझा' ही एकाहून एक सरस नाट्यगीते आणि यमन रागांतला तराणा पेश करून बहार आणली.

मध्येच या मैफलीने धुंद झालेल्या **श्री. विनायक पुरुषोत्तम चक्रदेव** (पृ. ७२८) या कुलबंधूनी एक भजन सादर करण्याची आपली अनावर इच्छा प्रगट केली. बुवा जातिवंत कलावंत. त्यांनी मुखातले स्वर गिळून आपली सहमती दर्शवली. श्री. चक्रदेवांच्या भावमधुर भजनानंतर शेवटी बुवांनी कबिराचा 'तू कायानगरका सौदागर' हा दोहा कव्वाली ढंगात आणि भैरवीच्या सुरात अतिशय भावपूर्ण स्वरात सादर केला. 'भावपूर्ण' हा एकच शब्द या ठिकाणी सुचतो. खरं म्हणजे संसाराच्या बाह्य रूपातील फोलपणा कबिराने कारुण्याची झालर लावून या दोह्यात व्यक्त केला आहे. बुवांनी ज्या कौशल्याने या दोह्यातील शांत रस उभा केला त्याला शब्द अपुरे पडतात.

या सर्व संगीत कार्यक्रमाला **मुंबईतील प्रसिद्ध तरुण तबलावादक श्रीपाद जाईल आणि सौ. विद्या जाईल (पेटी) यांची साथ होती.** शेवटच्या कार्यक्रमात तर चिरंजीव तबल्यावर, सौ. पेटीवर आणि मध्यभागी गाणारे श्रीमान असा अपूर्व त्रिवेणी संगम जुळून आला होता.

मराठे दांपत्यांनी त्यांच्या विवाहाचा रौप्यमहोत्सव एका वेगळ्या पण आदर्श पद्धतीने सादर केला. आपल्या आनंदाची वाटणी त्यांनी घरातल्या माणसांपुरती आणि जवळच्या नातेवाईकांपुरती मर्यादित न ठेवता सर्व मराठे कुलबांधवांवर संगीतानंदाची बरसात केली. आम्हाला या दांपत्याचे खरोखरच कौतुक वाटले.

मैफल संपली - नव्हे संपवावी लागली. वसंत पेयाची चव जिभेवर घोळत असताना, गझलांचे - नाट्यगीतांचे सूर कानांत घुमत असताना रसिक एकमेकांना निरोप देत, पुन्हा एकत्र येण्याची अपेक्षा बाळगीत घराकडे वळत होते. प्रत्येकाच्या मनात एकच विचार - 'वा. ग.' दांपत्याच्या विवाहाचा सुवर्ण महोत्सव असाच साजरा व्हावा आणि आपणापैकी प्रत्येकाने त्यात सहभागी व्हावं.

मराठे प्रतिष्ठान या कौटुंबिक संस्थेवर जिवापाड प्रेम करणारी, आपल्याजवळ देण्यासारखं आहे ते क्षणार्धात देणारी माणसं पाहिली की ऊर भरून येतो. जग वाईट नाही, चांगलं आहे. खरोखरच चांगलं आहे, याची खात्री नाही - पण क्षणभर प्रचीती येते. माणसांमधलं चांगलेपण अशा उपक्रमांतून प्रगट होतं. मला वाटतं यातच उपक्रमाचं यश सामावलेलं आहे. उपस्थितांची संख्या, कार्यक्रमातील विविधता हा सारा तपशीलाचा भाग आहे. खरं ना?

***

**एस्.एस्.सी. नंतर पुढे काय? बारावी नंतर कोठे काय? पदवीनंतर मार्ग काय?**

याबाबतचे विनामूल्य मार्गदर्शन **महाराष्ट्र व्यवसाय मार्गदर्शन केंद्र** (सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था म्हणून नोंदलेली), म्युनिसिपल शाळा, पहिला मजला, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई-२८ याठिकाणी सोमवार ते शुक्रवार सायं. ६.३० ते ८.०० या वेळात मिळू शकते.



संगीतानंदात तल्लीन झालेला श्रोतृवर्ग





Marathe Pratishthan

# साध्याही विषयांत आशय कधी, मोठा किती आढळे!

**- अनंत धोंडो खांबेटे** (पृ.६९८) शीव, मुंबई-४०००२२. (फोन : ४०२ ३२२०)

***माणसाचं सौंदर्य हे केवळ त्याच्या आकर्षक, सुंदर, रेखीव वा मोहक चेहऱ्यातच दडलेलं नसतं, तर ते पुष्कळदां त्याच्या वागण्या-बोलण्यात वा करण्यासवरण्यांतूनही प्रत्ययास येत असते. ते सौंदर्य किंवा शहाणपण हेरण्यास आपली दृष्टी चौरस हवी. निरीक्षण मार्मिक हवे.***

रोज सकाळी शिवाजी पार्कच्या कट्ट्यावर हजेरी लावणारे माधवराव. गेल्या तीन आठवड्यांत त्यांचे दर्शन नाही म्हणून बंडोपंत चिकटे त्यांच्या घरी गेले. स्वतः माधवरावांनीच दार उघडून बंडोपंतांचे स्वागत केले. 'इतके दिवस कोठे होता? काही थांग-पत्ता, ठाव-ठिकाणा?'

'अहो, सौ. च्या भाचीचं लग्न अकस्मात ठरलं. लग्न इंदूरला. आमंत्रण अति आग्रहाचं - नि ते सुद्धा फोनवर! आत्ता तुमच्या पुढं पाचच मिनिटं घरात शिरलो, अजून प्रवासाचे घामट कपडेही काढायचेत. घरात गेल्या तीन आठवड्यांतला धुरळा नि कचरा किती पडलाय, पाहताच आहां.' शिवाजी पार्कच्या कट्ट्यावरील दीर्घ गैरहजेरीचे स्पष्टीकरण एका दमांत माधवरावांनी केलं.

तत्कालीन तानमान हेरून बंडोपंत चिकटे आणखी चिकटून न बसतां म्हमाले, 'एकाएकी आपली तब्येत बिघडली की काय? हीच आम्हा दोस्त मंडळींना शंका. होऊ द्या आपलं सावकाश, संध्याकाळी कट्ट्यावर हजेरी लावायला मात्र विसरू नका!'

कित्येकदा बाहेरगावी जाण्यासाठी, सामानाची बांधाबांध चालू असते. मनुष्य आठवून-आठवून एकेक वस्तू बॅगेत भरत असतो. अशावेळी बंडोपंत चिकट्यांनी प्रत्ययास आणून दिलेले धोरणी शहाणपण इष्टच. 'ही ब्याद आत्ता कशाला उगवली?' असे आपल्यामागे कोणी म्हणता नये हे कटाक्षाने पाहिले पाहिजे.

दुसऱ्यापाशी बोलताना जास्त पाल्हाळ नको. मोजकेच बोलावे. आपले बोलणे दुसऱ्यास कंटाळवाणे होता नये. बोलणं थट्टेचं चांगलं. पण थट्टा जिव्हारी लागणारी नसावी.

प्रत्येकाच्या गावी जत्रा वा देवादिकांचे उत्सव असतात. स्वतः जर जत्रेला वा उत्सवाला जात नसाल, पण देणगी रूपाने काही रक्कम पाठवणे असेल, तर ओळखीच्या गावकऱ्याबरोबर देताना एका स्वतंत्र कागदावर आपलं नाव, पत्ता, देणगी रक्कम इ. लिहून द्यावे. त्या ग्रामस्थापाशी आपल्याप्रमाणेच आणखीही काही जणांनी द्रव्य साहाय्य दिले असेल. कागदावर टिपण असल्यास ग्रामस्थापर्यंत आपला दान हेतू पोचण्यास मदत होईल.

बृहन्मुंबई व उपनगरातल्या आपल्या स्नेही व आप्तमंडळींना प्रत्यक्ष भेटण्यासाठी अगोदर वेळ ठरवावी लागते. पण काही अनपेक्षित कारणामुळे ती वेळ पाळता येत नाही. दुसरा आपल्यासाठी २/३ तास ताटकळत राहतो. असं होऊ नये म्हणून फोनवर भेटण्याची वेळ व स्थळ ठरविताना, 'तू मामा काण्यांच्या हॉटेलसमोर उद्या संध्या. ६॥ ते ७ उभा रहा. मी तेथे येतोच. संध्या ७ नंतर मात्र तू माझी वाट पाहू नको.' अशा तऱ्हेची सोडवणूक किती सुखद होते.

अलिकडे स्त्रीमुक्ती विषयी बरंच काही लिहिलं-बोललं जातं. स्त्री जन्म मूलतःच कठीण. ज्यांच्या घरची काही म्हटल्या काहीही माहिती नसते, अशांच्या घरी तिथले रितीरिवाज, सर्व संबंधितांचे स्वभाव हे अति हुशारीने जाणून, चराचरांबद्दल आपलेपणा निर्माण करणे सोपे नव्हे. जरी सर्व तमाम सासवा 'अहो आई' झाल्या तरी नव-वधूंची विवाहोत्तर होणारी ही कसरत कसोटी घेणारी ठरते.

विवाह सोहळ्यांत एका टेबलावर रुखवतात मुलीच्या संसारात उपयुक्त म्हणून देण्यासारख्या वस्तू मांडलेल्या असतात. त्यांत सप्तपदी व तत्संबंधी बरीचशी वाङ्मय शोभाही असते. नवथरच माझे पाहण्यात 'माहेरची पाठवणी' ह्या शीर्षकाचे एक आशयघन काव्य वाचण्यांत आले. ते काव्य उधृत करण्याचा मोह न आवरल्याने खाली देत आहे.

### माहेरची पाठवणी

जीवनसत्वे जशी आरोग्यदायक तशी ती विवाहोत्तर जीवनांतही फलदायक. (सप्तपदी म्हणून मातच जीवनसत्वे विचारात घेतली आहेत.)

**अ**भ्यागत जरी । अवचित दारी ।
स्मित हास्य करी । स्वागतार्थ ॥१॥

**ब**डबड गमे । स्त्री सुलभ सार्थ ।
वाचाळता व्यर्थ । क्रियेवीण ॥२॥

**क**टुता कटाक्षें । सदोदित टाळा ।
स्नेहभरें लळा । लागों द्यावा ॥३॥

**ड**गमगूं नये । कधीही प्रसंगी ।
बाणवावा अंगी । धैर्य मेरू ॥४॥

**इ**श फिश म्हणूं । नको वाचे वाटे ।
गुलाबाला काटे । असतात ॥५॥

**न**को करूं चाळा । सदा तूं केसांशी ।
अन्नीं मिसळसी । गुंतवळ ॥६॥

**के**ल्या नि दिल्याची । न वाही अहंता ।
कर्ता करविता । पांडुरंग ॥७॥

असाच, एकदा टापटिपीचा आदर्श संसार करणाऱ्यांकडे गेलों असता, त्यांच्या दर्शनी भिंतीवर एक ठळकपणे लिहिलेली काव्यपंक्ती मनावर ठसली. 'प्रत्येक वस्तूस ठरीव जागा, त्या जागी ती वस्तू अवश्य ठेवा.' सुई-दोरा, बटणें, गोंद वा गम, नेलकटर, कात्री, कोयती, कपाटाच्या व घराच्या किल्ल्या अशा एक ना अनेक वस्तू काम झाल्यावर जागच्या जागी न ठेवता जेथे असतात तिथेच टाकून देतात.



Marathe Pratishthan

कपडे वाळत घालण्याची काठी काम झाल्यावर जागच्या जागी ठेवली जात नाही. शिवणाच्या डब्यांत सुई-दोऱ्याखेरीज अन्य वस्तू भाराभर! आलेली आप्त-स्वकीयांची पत्रे किंवा विवाहादि मंगल कार्यांची निमंत्रणे काम झाल्यावर तार फाईलला लावावीत. कोणाकडे एक-दोन दिवस पाहुणे म्हणून राहून परतल्यावर कार्ड टाकून त्यांनी केलेल्या स्वागताचे व आतिथ्यशीलतेचे कौतुक करावे. 'राखावी बहुतांची अंतरें - भाग्य येते तदनंतरें' आणि 'सर्वांमुखी मंगल बोलवावे।' हा समर्थांचा उपदेश कृतीत आणावा.

आजकाल सर्व विषयांची कॉलेजिस् नि कोचिंग क्लासेस. त्या त्या विषयांच्या डिगऱ्या नि डिप्लोमाज्. अलीकडील उठसूठ भरणारी शिबिरें नि कार्यशाळा असूनही, व्यवहार ज्ञानांत मोडणारे उपरोक्त विषय दुर्लक्षितच राहतात. म्हणून हा सर्व प्रपंच!!

व्यवहार-ज्ञान या सदरात अपरिमित व अनंत विषय येतात. अशा सर्वांचा समाचार केवळ अशक्य. पण एक अनुभवलेला प्रसंग सांगण्यासारखाच.

माझ्या मेहुण्यांबरोबर अशाच एका आप्तांकडे गेलो होतो. औपचारिक गप्पा-टप्पा झाल्यावर गृहिणीने तीन कप चहा आणला.

आमचे मेहुणे गंभीर मुद्रेने म्हणाले, 'मी चहा घेत नाही' कप परत घेऊन स्वैपाक घरात गेल्यावर 'अगोदरच नाही कां बोलायचं, म्हणजे सर्वांनाच कॉफी ठेवली असती.' असं गृहिणीनं फणकारल्याचे बाहेर मला चांगले ऐकू आले. नंतर मेहुण्यांना कॉफी आली. कॉफीपान झाल्यावर आम्ही निरोप घेऊन बाहेर पडलो, तेव्हा मनी खालील प्रश्नांचे काहूर माजले.

१. वेळ प्रसंग पाहून एकाद दिवशी चहा प्याल्याने काहीही बिघडणार नाही. आयुष्य वाढेल.

२. घरी कॉफीची पावडर असतेच असं नाही. परत ती वेळेवर सापडायला हवी!

३. गृहिणीनेही सर्वजण चहा पिणारे आहेत असं गृहीत धरूं नये.

४. अतिथी आपणहून 'मी चहा घेत नाही' असं कधीच सांगत नाही.

तेव्हा सर्व विचारांती क्र. १ मधला मार्ग श्रेयस्कर म्हणून 'स्वीकारार्ह'.

वरील विवेचनात 'प्रत्येक वस्तूस ठरीव जागा, त्या जागी ती वस्तू अवश्य ठेवा' ह्याचे महत्व पटले तरी 'हेही नसे थोडके' असे सर्वांच्या प्रत्ययास येण्यास प्रत्यवाय नसावा.

***

---

ब्राह्मण सेवा मंडळ, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई-४०० ०२८ यांच्या

## उद्योजक सहाय्य योजना

ज्ञातीतील होतकरू व गरजू उद्योजकांना स्वतःच्या व्यवसायासाठी आर्थिक मदत करण्याच्या उद्देशानी 'स्वप्नपूर्ती बीज भांडवल योजना' व कौशल्य /प्रत्यक्ष अनुभव असलेल्या परंतु ज्यांचे व्यवसाय लहान स्वरूपाचे असल्याने पतक्षमता व तारण नसल्याने बँक/वित्त संस्थेतून कर्ज घेणे शक्य नसल्याने व अर्थ सहाय्याची रक्कमही लहान आहे अशा व्यावसायिकांसाठी 'हातभार उद्योजक अर्थसहाय्य योजना' कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

### स्वप्नपूर्ती बीज भांडवल योजना

**पात्रता :** ब्राह्मण सेवा मंडळाच्या सभासदत्वाच्या अटींची पूर्तता करणारी ४० वर्षांपेक्षा कमी वयाची व्यक्ती.

**व्यवसाय/उद्योगाचे स्वरूप :**

१) प्रत्यक्ष उत्पादन/शेतीवर आधारित/प्रक्रिया/जुळणी.

२) वीज/तेल अथवा सौर उर्जेचा वापर.

३) किमान ७ व्यक्तींना रोजगार उपलब्ध व्हावा.

४) प्रकल्पाचा एकूण खर्च रु. ४ लाख असावा.

५) प्रकल्प बँक/वित्त संस्थेने अभ्यासून कर्ज मंजूर केलेला असावा यांत प्रचलित उद्योगांचा विस्तार व सुधार कार्यक्रमांचाही समावेश असू शकेल.

**कर्जप्रमाण :**

प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा बीज भांडवलाच्या ३/४ किंवा रु. २.५० लाख (यापैकी जी रक्कम कमी असेल) पर्यंत कर्ज उपलब्ध होऊ शकेल.

### हातभार अर्थसहाय्य योजना

**पात्रता :** ब्राह्मण सेवा मंडळाच्या सभासदांना या योजने अंतर्गत अर्थसहाय्य मिळू शकेल. सभासदाचे वय ६० वर्षांहून जास्त नसावे.

**व्यवसाय/उद्योगाचे स्वरूप :**

१) घरगुती उद्योग - प्रत्यक्ष उत्पादन/सेवाक्षेत्र

२) लघू व्यावसायिकांसाठी यंत्र सामग्रीसाठी.

३) व्यवसायवाढीसाठी अर्थसहाय्याची अपेक्षा.

**सहाय्य :**

१) या योजने अंतर्गत अर्थसहाय्य प्रायः वस्तूरूपाने करण्यात येईल. असे सहाय्य कमाल रु.१ लाखापर्यंत राहील. रोख स्वरूपात अर्थसहाय्य अपेक्षित असल्यास त्याबाबतीत कमाल मर्यादा रु. २५००० राहील.

***

## प्रतिसाद

मार्चचा ३३वा अंक कालच मिळाला. 'धो धो पावसाचा' पाणी वळवून हिताच्या 'हरित क्रांती'साठी योजक उपयोग ठाई ठाई दिसला. 'आदर्श माता' मध्ये मुलांना आईची महती कशी पटत नाही? ही शंकायुक्त कोपरखळी छान वाटली. फोनची 'ट्रिंग ट्रिंग' ही प्रेरक आहे.

हे सगळेच वाचत असताना धक्का बसला तो बापुसाहेबांच्या निधन वृत्ताने. रत्नागिरीच्या सम्मेलनातील त्यांची उपस्थिती, तरुणालाहि लाजवील असा त्यांचा उत्साह, त्यांचे मनामनात ठसलेले सन्मामाचे उत्तर, सगळे कसे आत्ता आत्ताच घडते आहे असे वाटते. आपण आपल्या हृदयातील दुःख मोजक्या शब्दांत व्यक्त केलेत. हा आपला संयम आणि 'असा त्याग अशी माणुसकी' ही टाकलेली परिणामकारक चौकट हे सगळेच लक्षणीय.

इथल्या बांधवांचा मेळावा घेणे हे आता जवळच्या काळात शक्य होईल असे वाटते. सध्यातरी त्रैमासिक हे रूपच हितगुजसाठी ठीक वाटते.

**- जनार्दन गोविंद** (पृ. ४०५)
कोफराड, आगाशी.



Marathe Pratishthan

# सौंदर्यप्रसाधनेतील पुरुषांचा वाटा

**- सौ. सुनिता राजन** (पृ. ५१३), स्वरूप ब्युटी पार्लर, पुणे (फोन ६२१००४)

सौंदर्याची मिरासदारी केवळ स्त्रीकडेच आहे असे नाही तर ह्याबाबतीत पुरुषालाही स्त्रीइतकाच हक्क आहे.

पुरुषाला सुंदर दिसण्याची गरज नसते किंवा तो मुळातच सुंदर असतो असे नव्हे. फक्त त्यांच्या बाबतीतल्या सुंदरपणाच्या आपल्या कल्पना वेगळ्या असतात.

स्त्री सौंदर्य व पुरुष सौंदर्य यातील मूलभूत फरकामुळे त्यांची प्रसाधने वेगळी असतात. पुरुषांचा सुंदरपणा रांगडा आहे तर स्त्रीचा मृदू ! म्हणून सुंदरता म्हणजे इथे आपण असा अर्थ घेऊ की ज्याच्या अस्तित्वामुळे आपल्याला आल्हाददायक वाटते. त्यासाठी काय करायला हवे तर बांधा चांगला ठेवण्यासाठी सूर्यनमस्कार, प्राणायाम, योगासने. त्यामुळे शरीरस्वास्थ्य मिळून त्वचाही कांतीमान राहील. आपले व्यक्तिमत्व उठावदार करण्यासाठी त्याला जागरूक रहावे लागेल. यासाठी स्वच्छता, टापटीप, व उत्तम आरोग्य यांची गरज आहे. त्यासाठी रोज दाढी करणे आवश्यक आहे. वाढवायची असेल तर ती स्वच्छ राहील व मुलायम राहील हे बघणे आवश्यक. त्यासाठी तेल व कंडीशनर आवश्यक आहे.

शारीरिक कष्ट जास्त - घाम जास्त. म्हणून आंघोळीच्या पाण्यात ओ. डी. कलोन टाकावे. त्वचा चांगली रहावी म्हणून सर्वांगाला तेलाचे मालिश करावे. बुशशर्ट अथवा अर्ध्याबाह्यांमुळे हातांचे कोपर बाहेर रहातात. ते काळे पडू नये म्हणून लिंबू, तेल, डाळीचे पीठ चोळून लावावे.

वाढत्या वयात पिंपल्स येतात. दाढी करताना ते फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी. कारण कापले गेल्यास डाग पडतो. नखाने फोडल्यास डाग पडतो. फक्त डागांवर 'रेटीनो ऎ' हे क्रिम रात्री लावावे. त्यावर टयुबलाईटचा प्रकाश पडू देऊ नये. तीन आठवड्यात डाग कमी होतात.

हातापायाची नखे कापून स्वच्छ ठेवावी. पायांसाठी पेडिक्युअर महिन्यातून १ वेळा तरी करावे. पायात सतत बूट वापरल्याने कॉर्न्स होतात. त्यासाठी आंघोळीच्या वेळी पावले प्युमिस स्टोनने घासून स्वच्छ करावी.

केसांच्या बाबतीतही स्त्री इतकेच जागरूक असावे. शोभेल असा कट करावा पण तो स्वच्छ, नरम चकचकीत राहील याती काळजी घ्यावी. रोज शांपू किंवा साबण न वापरता धुवावे. कारण शांपू रोज वापरल्याने केस कोरडे होतात. डोक्यात कोंडा होतो. कोंड्यासाठी बाजारात डँड्रफ लोशन मिळते ते अंघोळीपूर्वी १ तास डोक्यास लावून नंतर केस धुवावे. आठवड्यातून १ वेळा तेल लावावे. दुसऱ्याचे कंगवे अथवा ब्रश वापरू नयेत. डोक्याला टक्कल पडणे अनुवंशिक आहे. पण लहानपणापासून काळजी घेतल्यास कमी टक्कल पडते. केस पांढरे झाल्यास ॲलर्जी टेस्ट करून डाय वापरावा.

पोषाखही योग्य असावा. स्वत:च्या बांध्याला शोभेल असा असावा. कृश पुरुषांना टाईट पँटस् शोभत नाहीत. तसेच त्या मोठ्या पोटाच्या स्थूल पुरूषांनाहि शोभत नाहीत. कपडे किमती असणे आवश्यक नाही तर ते स्वच्छ धुतलेले व इस्त्री केलेले तसेच योग्य फिटींगचे असणे आवश्यक.

पान, तंबाखू, सिगरेट-विडी टाळता आल्यास बरे कारण त्याचा तीव्र गंध घामातूनही पाझरतो व जवळ असणाऱ्या माणसाला शिसारी आणतो.

पुरुषांसाठी असणारे परफ्युम्स योग्य प्रमाणात कानामागे व मनगटावर लावावे. तेथे त्यांचा सुगंध जास्त वेळ टिकतो. बोलण्या-वागण्यात अदब असावी. दुसऱ्याचे म्हणणे पूर्ण ऐकून घेण्यास मनाचा संयम आवश्यक आहे. त्यामुळे तुमच्या व्यक्तिमत्वाबद्दल लोकांच्या मनात नक्कीच आदर राहील.

***

## मला आणखी आयुष्यांत काय पाहिजे?

मनोहरांशी (डॉ. मनोहर खेर) लग्न करण्यापूर्वीच त्यांनी मला त्यांच्यावरच्या जबाबदाऱ्यांची पूर्ण कल्पना दिली होती. ही सर्व आव्हाने स्वीकारून मी मनोहरांशी जिद्दीनं लग्न केलं. घरातल्या सर्व परिस्थितील तोंड देत देत मी - मनोहरांनी आमचा संसार यशस्वी करून दाखवला.

आज माझी व मनोहरांची भावंडं त्यांच्या नशिबानं अत्यंत सुस्थितीत आहेत. माझ्या मुलांचेही संसार सुखात चालले आहेत. अद्वैत व उत्तरा यांनी नव्याने सुरू केलेल्या धंद्यात यश मिळवलं आहे. त्या दोघांनी नाशिकला 'तंदूर' नावाचं एक छोटसं रस्टॉरंट सुरू केलं आहे. उत्तरा व अद्वैत वेळ मिळेल तेव्हा मॉडेल म्हणून 'ॲड फिल्म' मध्ये काम करतात. उत्तरा १९८२-८३ची 'मिस इंडिया' (उत्तरा म्हात्रे) आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. पण तिच्या वागण्यात याचा गर्व दिसून येत नाही. याचं बरचसं श्रेय तिच्या आई-वडिलांना द्यायला हवं - त्यांनी आपल्या मुलीवर चांगले संस्कार केले.

संहिता लग्न करून गेली पण तिची जागा ताबडतोब उत्तरानं घेतली. मी तिच्याकडे सून म्हणून कधीच पाहिले नाही. नात्यानं मी तिची सासू असेन; पण मनानं मी उत्तराचीही आईच आहे.

संहितानं लग्न करताना खूप मनस्ताप दिला. मनाला खूप वेदना झाल्या; पण जावयांनी त्यांच्या सुस्वभावामुळे त्या वेदनाही नाहीशा केल्या. माझा जावई - बाबा आझमी - हिंदी चित्रपटसृष्टीत उत्कृष्ट कॅमेरामन म्हणून ओळखला जातो. त्यालाही उत्कृष्ट फोटोग्राफीची पारितोषिके मिळाली आहेत. संहिताची सासू शौकत व सासरे कैफी आझमी तिच्यावर खूप माया करतात. शबानाच्या गळ्यांतला तर ती ताईतच आहे. एकंदरीत संहिताही तिच्या सासरी खूप सुखी आहे. सगळ्यांत मला अभिमान वाटावा अशी एक घटना माझ्या आयुष्यात घडली. ती म्हणजे संहिताला (तन्वीला) 'रावसाहेब' चित्रपटासाठी उत्तम अभिनेत्री म्हणून प्रियदर्शनी ॲवॉर्ड मिळाला.

मला आणखी आयुष्यांत काय पाहिजे?

**- मुंबईच्या माजी नगरपाल उषाकिरण** (उषा बाळकृष्ण-पृ.१९०) 'उष:काल' या आत्मचरित्रांतून.

***



Marathe Pratishthan

# मी असा घडलो

**- कमलाकर अनंत जाईल** (पृ.७५७), पुणे

***बहुतांश लोकांचे आयुष्य चाकोरीबद्ध असते. जशा वेली वृक्षाच्या आधाराने वाढतात तसे त्यांचे तरुणपणापर्यंतचे आयुष्य आई, वडील अथवा इतर जबाबदार पालकांचे आधारे व्यतीत होत असते. परंतु काही अपवादात्मक व्यक्तींचे आयुष्य आई-वडीलांचे आधाराशिवाय अतिशय खडतर अवस्थेत व्यतीत होते व त्या व्यक्ति स्वबळावर व स्वकर्तृत्वावर यशाची पायरी गाठतात. अशाच व्यक्तिपैकी मी एक.***

माझा जन्म पूर्वाश्रमीच्या जव्हार संस्थानमध्ये १९३८ साली झाला. माझे वडील कै. अनंत गोपाळ जाईल हे जव्हार संस्थानचे मुख्य वनरक्षक अधिकारी होते. ते तत्कालीन महाराज यशवंतराव मुकणे यांचे विश्वासू सहकारी होते. तसचे एक उत्तम प्रवचनकारही होते. ते एक धीरोदात्त, प्रामाणिक व तत्वनिष्ठ व्यक्तिमत्व होते. त्यांचे लग्न झाल्यानंतर लगेचच माझ्या आईला सरकारी दवाखान्यातील परिचारिकेच्या निष्काळजीपणामुळे अंधत्व आले. अशा प्रसंगीसुद्धा त्यांनी आपले धैर्य खचू दिले नाही. एवढेच नव्हे तर ज्या परिचारिकेमुळे आईला अंधत्व आले तिच्यावर सुद्धा क्षमाशील होऊन कोणतीही कारवाई केली नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात महाराजांबरोबर त्यांचे तात्विक मतभेद झाल्याने त्यांनी तडकाफडकी आपल्या उच्चपदाचा त्याग केला. वडीलांनी नोकरी सोडताच अनेक संकटांची मालिका सुरू झाली व आर्थिक परिस्थिती पूर्णतः डबघाईला आली. याचा परिणाम म्हणून मला व माझ्या लहान बहिणीला अतिशय हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या. बहीण लहान असल्याने (२/३ वर्षे) व आई आंधळी असल्याने बहीणीचा सांभाळ करण्यासाठी तीन वर्षे शाळेला रामराम ठोकावा लागला.

पुढे उदरनिर्वाहासाठी व शिक्षणासाठी वयाच्या दहाव्या वर्षीच जव्हार सोडून मनमाड येथे मोठ्या बहिणीच्या आश्रयास यावे लागले. तेथे वर्तमानपत्रे विकून तसेच खानावळीत काम करून मी माझे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे मनमाड सोडून मुंबईस आलो. तेथे प्रभादेवी येथील सिद्धी विनायक मंदिरासमोरील भोर इंडस्ट्रीज लिमिटेड या कारखान्यात रोजंदारीवर मजूर म्हणून कामास लागलो. राहण्यास जागा नसल्याने ओळखीच्या एका ठिकाणी दरमहा रु. ५ प्रमाणे बाल्कनीत झोपण्यासाठी जागा मिळवली. गोरेगावच्या अ. भी. गोरेगांवकर रात्र शाळेत नाव दाखल केले. कारखान्यात कायमस्वरूपी तिसरी पाळी करून शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले.

अशा खडतर प्रयत्नातून अकरावीपर्यंत मजल मारली. परिक्षेचा फॉर्म भरण्यासाठी पैसे नसल्याने रात्रभर दादर स्टेशनवर हमाली केली. उत्तम प्रकारे एस. एस. सी उत्तीर्ण झाल्याने लगेचच कराड येथे महाराष्ट्र शासनाच्या सेवेत प्रवेश मिळाला. तेथून पुढे बदली होऊन पुण्यास आलो व बाहेरून कॉलेजचे शिक्षण चालू केले. परंतु सातत्य न राहिल्याने कॉलेज शिक्षण पूर्ण करता आले नाही. १९६५ साली माझे लग्न झाले व १९७१ पर्यंत दोन मुले झाली. यथावकाश निरनिराळ्या परीक्षा देत शासकीय सेवेत राजपत्रित अधिकारी पदापर्यंत मजल मारली. माझ्या पत्नीनेसुद्धा लग्नानंतर शालान्त परीक्षा, जी. सी. डी. करून नोकरी करून संसाराला हातभार लावला.

ऑगस्ट १९९७ मध्ये मी लेखाअधिकारी या पदावरून अर्थखात्यातून सेवा निवृत्त झालो. माझी दोनही मुले यशस्वीपणे स्वतंत्र व्यवसाय करीत आहेत.

***

***(अशा तऱ्हेच्या Self-made व्यक्तींची ओळख हितगुज मधून सर्व कुलबांधवांना व्हावी म्हणून अशा कर्तबगार व्यक्तींनी आपली माहिती कळवावी. - संपादक)***

## एक चित्तथरारक आठवण

माझे वडील उत्तम प्रवचनकार होते. खुद्द जव्हार तसेच पंचक्रोशीत ते प्रवचने करीत असत. ते संस्थानच्या सेवेत उच्चपदस्थ अधिकारी असल्याने सर्वत्र मान होता. एकदा जव्हारच्या राम मंदिरात त्यांचे प्रवचन होते. प्रवचनास बराच प्रेक्षक वर्ग होता. मी सुद्धा पुढेच वडलांच्या समोर बसलो होतो. प्रवचन ऐन रंगात आले असतानांच वडलांच्या डोक्यावरील आढ्यावर एक भला मोठा सर्प लोंबकळू लागला. तो सर्प भयंकर विषारी मण्यार असल्याचे पहाताक्षणीच दिसत होते. हा प्रकार पाहून आम्हा सर्वांची भीतीने गाळण उडाली. परंतु वडील मात्र शांत होते. त्यांनी सर्व जणांना कोणतीही हालचाल न करता शांतपणे बसण्यास सांगितले व आपले प्रवचन चालू ठेवले. तेवढ्या वेळांत तो सर्प आल्यामार्गाने निघून गेला व सर्वांनी संकट टळल्याचा निःश्वास टाकला. वडिलांच्या धारिष्ट्याचे कौतुक केले.

## प्रतिसाद

हितगुज मार्च ९८ चा ३३ वा अंक मिळाला. नागपूरच्या कुलबांधवांना काल दि. ३१.३.९८ ला खालीलप्रमाणे कळविले (एकंदर २२ कुलबांधव).

'शहरातील कुलबांधवांनी एकत्र यावे असे वाटते. कुलवृत्तांताची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होऊन पाच वर्षे झालीत. त्यातील माहिती सुमारे दहा वर्षांपूर्वीची आहे. कुलवृतांताच्या नूतनीकरणाचा विचार 'हितगुज' मार्च १९९८ च्या अंकात दिला आहे. प्रतिष्ठानचे १७५ सभासद 'हितगुज' चे वर्गणीदार नाहीत. बहुदा आपण वर्गणीदार असाल. नागपुरातील कुलबांधवांनी एकत्र यावे व प्रतिष्ठानच्या कामाला वेग आणावा असे आवाहन 'हितगुज' करीत असते. यासाठी आपणास कळविले आहे. आपले विचार पत्राने कळवावेत ही विनंती.'

विदर्भात-नागपूरला कुलबांधवांनी उत्साह दाखवावा असा प्रयत्न आहे. हितगुजच्या माध्यमातून कुलबांधवांना एकत्र आणण्याचे चांगले कार्य होत आहे. हितगुज मासिक व्हावे असे मलाहि वाटते.

**- प्रभाकर केशव** (पृष्ठ ३५५), नागपूर

***



Marathe Pratishthan

# सलवार कुडता व मराठी भगिनी

- **सौ. आशा वि. चक्रदेव** (पृ. ७२८) विलेपार्ले, मुंबई

***फॅशनच्या नावाखाली आपण आपली संस्कृती, राहणी व इतर बऱ्याच गोष्टी विसरत चाललो आहोत, फॅशनच्या नावाखाली आपलं स्वत्व विसरणे योग्य आहे का?***

सारखा काळ चालला पुढे ! खरचं ! काळ कोणासाठी थांबत नाही. स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षांचा काळ लोटला. या काळाने कितीतरी स्थित्यंतरे पाहिली. या महान महाराष्ट्राची वैशिष्ट्ये सर्व देशात विशेष वाटतात. त्यांचा ठसा उत्तमप्रकारे सातासमुद्रापार उमटविण्यात यश मिळविले.

आपली संस्कृती आपणच जपली पाहिजे, वाढविली पाहिजे, उत्तमरीतीने टिकविली पाहिजे परंतु सध्यातरी मराठी जसे मागे पडत चालले आहे तसेच - या मराठी भगिनी अशा का वागतात? असा प्रश्न माझ्या मनात आला. मी एक महाराष्ट्रीयन स्त्री आहे म्हणून माझ्या मनात आलेले विचार, 'विचार' करण्यासाठी आपल्यापुढे ठेवीत आहे.

आम्ही आम्हाला सुधारक समजू लागलो. दुसऱ्याचे चांगले घ्यावयास काहीच हरकत नाही परंतु त्याचा अतिरेक होता कामा नये.

आपले व्यक्तिमत्त्व वाढविण्यासाठी पोषाख फार महत्त्वाचा आहे. तो प्रत्येकाच्या बांध्यास कसा काय दिसतो याचा विचार केला पाहिजे. केवळ टि. व्हि. व सिनेमा याचे अनुकरण आपण सुरू केले. वास्तविक पाहता सलवार-कुडता व ओढणी असा पोषाख पंजाबी - शीख स्त्रिया पुष्कळ वर्षे वापरीत आहेत. तो पोषाख सुटसुटीत व सुरक्षित असा आहे पण आम्ही त्यातील सलवार-कुडता घेऊन स्त्रीलज्जेसाठी ओढावयाच्या ओढणीला वाऱ्यावर सोडून दिले याचे कारण काय ? दुसरे असे की सुटसुटीत नावाखाली हा ड्रेस कोणत्याही वयाच्या व कोणत्याही आकाराच्या स्त्रिया घराघरातून, ऑफिसमध्ये व शाळांमधून वापरू लागल्या. काही जीवनमूल्ये विसरून सर्वांनी तो स्वीकारला. या पोषाखात सौंदर्य वाढते पण अतिरेकाने ते कमी होते.

भारतीय परंपरेनुसार स्त्री म्हणजे शालिनता सर्व शरीर व्यवस्थित झाकून नऊवारी किंवा पाचवारी साडी, कपाळावर कुंकू, सुंदर केशभूषा असलेली स्त्री डोळ्यासमोर येते. पण फॅशनच्या नावाखाली सुंदर केस घालवून बसलो, जो स्त्रियांच्या सौंदर्याचा अविभाज्य भाग होता. केस कापून बॉबकट संस्कृती सुरू झाली. वेणी घालायची कोणी? म्हणून थोड्या केसांच्या आकारासाठी सोयीस्कर, वेळेची बचत, कामाची कपात करण्यासाठी निरनिराळ्या हेअरपिना, हेअरबँड आले व आता रंगीबेरंगी मॅचिंग फडकी आली व त्याचा वापर सुरू झाला. बदल हा हवाच! पण?

लेकी सुनांचा विचार न करता केलेली फॅशन ही ओंगळ दिसते पण हे सांगणार कोण? सर्वांनाच टि. व्ही. सिनेमातल्यासारखे दिसायला हवे आहे. आम्ही मॉडर्न आहोत ते फक्त पोशाखानेच दाखविले पाहिजे का? बरं तसं पाहिलं तर हे ड्रेस स्वस्त तरी आहेत का? तर साडीपेक्षा महागच आहेत. अर्थात हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. परंतु महाराष्ट्राने आपली थोर परंपरा दुसऱ्यांना घालून दाखवून दिली आहे. दुसऱ्यांची घेतलेली नाही. याचा अर्थ चांगले ते घ्यावे पण आपले सोडू नये. सध्या मुलां-मुलींपुढे सिनेमा हाच आदर्श आहे. निदान मातांनी, आजींनी तरी आपल्या चाली-रीती यांचा आदर्श ठेवण्यासाठी धडपडले पाहिजे आज ना उद्या त्याचा परिणाम नक्कीच चांगला दिसेल. अर्थात स्त्रीचे क्षेत्र चूल आणि मूल इतकेच राहिले नाही. पुरुषांच्या बरोबरीने स्त्री पुढे आली. तिचा उत्कर्ष तिने केलाच पाहिजे; परंतु मर्यादा ठेवली पाहिजे. त्यात तिचे सौंदर्य जास्त आकर्षक ठरेल.

***

# शोक

- **सौ. मृणाल दत्तात्रय खांबेटे**
(पृ. ७०४), मुलुंड, मुंबई.

***पुत्र सचिन याचे वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी अचानक निधन झाले. जून १९९८ हा त्याचा तृतीय स्मृतिदिन. त्यानिमित्त मुद्दाम ही त्याच्या मातेची कविता.***

सायंकाळी एके दिनी,
अश्रू तरारले लोचनी ॥१॥

मावळल्या तिन्ही सांजा,
का, पुत्र घरा येईना माझा ॥२॥

कातरवेळी जीव व्याकुळला,
शंका - कुशंकांनी पोखरला ॥३॥

मध्यरात्री कळले मातेला,
काळाने घाव घातला ॥४॥

मातृहृदय आक्रंदले,
कळेना, अकस्मित कसे घडले ॥५॥

शोक न आवरे पळभरी,
वाटले, व्यर्थ जिणे परी ॥६॥

अचानक पुत्र आला स्वप्नी,
वदला, का अश्रू आणलेस नयनी ॥७॥

मी तर आहे निरिच्छ योगी,
धन दौलतीचा लोभ नसे मजलागी ॥८॥

करू नकोस तू शोक व्यर्थ,
जीवनास या नसेच अर्थ ॥९॥

मोहमायेचे जाल सारे,
एक ईश्वर-रूप खरे ॥१०॥

माझा आत्मा सदैव तुम्हासमवेत,
तेथूनच पाहिन मी साऱ्यांचेच हित ॥११॥

शरीराने जरी दिले अंतर,
मन माझे, तुझेच आहे निरंतर ॥१२॥

***

***(मुलाने स्वप्नात येऊन दिलेला संदेश कृतीत आणण्यासाठीच की काय सौ. मृणाल खांबेटे यांनी मुंबईतील 'वात्सल्य ट्रस्ट'च्या कार्यात सहभागी होऊन तिथल्या अभागी, अनाथ मुलांवर मातृप्रेमाचा वर्षाव करायचे व्रत स्वीकारले असावे. दु:खाच्या डोंगरातही सुखाचे कण शोधण्याची ही वृत्ती खचितच कौतुकास्पद! - संपादक.)***



Marathe Pratishthan

# 'आयुर्वेद' विचार

**- वैद्य रामचंद्र शिवराम, आयुर्वेद विद्या विशारद,** (पृ.४०), पुणे.

चंद्रगुप्त व त्याचा समर्थ पंतप्रधान चाणक्य. त्याने आयुर्वेदाचा अभ्यास केलेला होता. चंद्रगुप्त व त्यावेळचे सम्राट म्हणविणारे अधिपति आयुर्वेदाच्याच औषधी व वैद्यांचा सल्ला घेत असत. सर्व भारतात पाटलीपुत्र व पेशावर ही आयुर्वेदाची मोठी शिक्षण स्थाने होती. तेच औषधीशास्त्र प्रचारात होते. बौद्ध काळामध्ये त्याचा ऱ्हास झाला व त्यांचे वैद्यक आले. तरी सुद्धा त्या शास्त्राचा लोप न होता ते उत्तम तऱ्हेने जीव धरून होते. विशेषतः उत्तर हिंदुस्थानात त्याचा वापर लोक अधिक करीत व वैद्यवर्गाला जनतेत मान दिला जाई.

अर्वाचीन वैद्यक शास्त्राचा प्रचार व प्रसार सर्व जगभर झाला. अनेक संशोधकांनी निश्चित अशी त्या औषधांची बैठक, सुलभता, रोग निवृत्ती दाखवून दिल्याने ते प्रसरण पावले. त्यामध्ये गेल्या शंभर वर्षात राज्यकर्ते इंग्रजांनी त्यास हातभार लावला व आयुर्वेदाचे प्रगतीला आणखी अडथळे आणले.

तरी भिषग्वर्ग टिकून राहिला. औषधे निर्माण होत राहिली. काही देशी औषधांचे कारखानेही भारतभर उभे राहिले. वैद्यवरांचा स्वतःचे घरी औषधे तयार करण्याकडे कल होता व रुग्ण चिकित्सेमध्ये ते त्याचा वापर सहजतेने व विश्वासपूर्वक करीत. शासनाचे मदतीमुळे अर्वाचीन वैद्यकाची वाढ होऊन ते स्थिर झाले. आसेतु हिमालयापर्यंत त्याला लौकिक लाभला. त्या शास्त्राची पुस्तके व संशोधनपर लेखन सुशिक्षित माणसाचे आकर्षण होते. अनेक जीव घेणारे रोग त्या चिकित्सेने बरे होत हे त्यांनी आजमाविले होते. अनुभवले होते. हे पक्के रुजावे म्हणून त्यांनी देशभर, कॉलेजे, रुग्णालये स्थापन केली व त्या माध्यमांतून आपले वैद्यक दृढ केले.

लोकमान्यांना या शास्त्राची म्हणजे आयुर्वेदाची आपले देशात वाढ व्हावी अशी इच्छा होती. त्या दृष्टीने धन्वंतरी डॉ. भडकमकर यांचेशी त्यांनी चर्चा केली होती. त्याबद्दलचे धोरण ठरविण्याकरता पुन्हा भेटण्याचे ठरले. पण भारताचे दुर्दैव असे की त्यांचे भेटीचे अगोदरच लोकमान्यांना काळाने ओढून नेले व तो प्रश्न तेथेच विरला.

पुढे १९२० चेच वर्षात असहकार चळवळीमध्ये त्यावेळचे पुढाऱ्यामध्ये आयुर्वेदाला राष्ट्रीय वैद्यक म्हणून शिकवण्याची सोय व्हावी अशी प्रेरणा उत्पन्न झाली. त्यानुसरून पुण्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाली. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांनी सर्व अभ्यासक्रमाची टाचणे तयार केली. पुण्यास एक टिळक विद्यालय सुरू झाले व सर्व शास्त्राचे अभ्यासक्रमाची व्याख्याने व परिक्षांची व्यवस्था झाली. त्यातच आयुर्वेदाची एक शाखा स्थापन केली गेली. विद्यापीठाने वैद्य व डॉक्टरांचे मदतीने एक मिश्र अभ्यासक्रम तयार केला. ४ वर्षे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याला परिक्षेस बसता येत असे. त्यामध्ये आयुर्वेदाचा मिश्र अभ्यासक्रम शिकविला जाई. अभ्यासक्रम व परीक्षा जवळ जवळ पन्नास वर्षे चालू होत्या. नगर व सातारा येथेही मिश्रच अभ्यासक्रम शिकविला जाई.

या वैद्यकीय अभ्यासक्रमाला सर्वानुमते प्रत्यक्षाची जोड असल्याशिवाय प्रगत अभ्यास होऊ शकणार नाही हे ध्यानी आणून औषधी निर्माणाकरता आयुर्वेद रसशाला सुरू केली व गूळआळीमध्ये ५ खाटांचे एक रुग्णालय स्थापन झाले. त्याच रसशाळेचे आजचे स्वरूप जगत्मान्य असे झाले व हॉस्पिटल ही भारतात महशूर झाले. (शेठ ताराचंद धर्मार्थ रुग्णालय) आयुर्वेद शिक्षणाचा पाया भक्कम झाला.

१९३८ मध्ये सरकारने त्याला मान्यता देऊन एक विधेयक मंजूर करून घेतले व मुंबईस व नांदेड येथे सरकारी आयुर्वेदाची कॉलेजे व रुग्णालयाची स्थापना झाली. जनसामान्यांची दृष्टीही बदलली व लोक या वैद्यकाकडे कुतुहलाने पाहावयास लागले. शासनाने बोर्ड व फॅकल्टी निर्माण करून त्याला हातभार लावला. सरकारी मदत मिळू लागली. तरी सुद्धा सरकारचे लक्ष जावे तसे जात नाही.

मध्यवर्ती सरकारने सुद्धा एक कोड स्थापन करून अभ्यासक्रम ठरविला. परीक्षापद्धती ठरविली. सर्व भारतात तोच अभ्यासक्रम चालू झाला. त्या वैद्यकाला आता चांगले दिवस आले. परंतु सरकारचे खजिन्यातून म्हणावी अशी मदत केली जात नाही. उपेक्षाच होते.

सुश्रुतामध्ये अनेक शस्त्रकर्ते आहेत. (मोतिबिंदू, मूतखडा, पाईल्स, पोटाचे काही रोग, स्त्रियांचे रोग वगैरेचा उहापोह केलेला आहे.) आजचे शास्त्रवर्गाचा पाया सुश्रुतात आहे हे अर्वाचीन वैद्यक विशारदांना मान्य झाले आहे. त्याकरतां वापरात आणावयाची शस्त्रे, शल्यशलाकांचे वर्णन सुश्रुतात आहे.

आयुर्वेद आता लुप्त होत नाही हे निश्चित. अनेक स्नातक व आयुर्वेदीक औषधे निर्माण करणारे कारखानदार पार पश्चिमेच्या व पूर्वेच्या युरोप, अमेरीका, अरब देश, दक्षिण एशिया मध्ये व्याख्यानाकरता व प्रसार व प्रचाराकरता जात आहेत. त्यांतील काही देशात औषध विक्रीची स्थाने निर्माण झाली आहेत. त्या त्या भागांतील इच्छुक पुण्यात येऊन शास्त्र समजावून घेत आहेत व आपलेही विद्वान वैद्य त्यांचे घरी जाऊन आयुर्वेदाचे महत्व पटवून देत आहेत.

कै. वैद्य पुरुषोत्तम शास्त्री नानल हे नेहमी म्हणत, 'पौरात्य, पाश्चात्य विद्वानांनी हिंदुस्थानात येऊन शास्त्र समजून घेतले पाहिजे व आयुर्वेदाची औषधे तिकडे निर्यात व्हावयास पाहिजेत.' हे सर्व घडण्याची क्रिया सुरू आहे. दिवसेंदिवस वाढत आहे. हे पाहून त्यांचे आत्म्याला समाधान लाभेल.

***

## यशाचे रहस्य

**नेहमीचा प्रश्न** : तुमच्या यशाचे रहस्य काय?
**उत्तर** : चांगले निर्णय

**प्रतिप्रश्न** : तुम्ही चांगले निर्णय कसे घेता?
**उत्तर** : अनुभवातून!

**प्रश्न** : तुम्हाला अनुभव कसा मिळतो ?
**उत्तर** : चुकीचे निर्णय घेण्यातून!!

**तात्पर्य** : आत्मपरीक्षणातूनच आपण आपल्या चुका सुधारू शकतो.

- प्रतिष्ठानचे अध्यक्ष **सुरेश सखाराम** (पृ.३९९), मुंबई.

Marathe Pratishthan

# १० वी व १२ वी नंतर पुढे काय ?

***या महिन्यात १० वी व १२ वी चे निकाल लागणार आहेत. पुढे काय? हा यक्षप्रश्न सर्व सफल विद्यार्थी व त्यांचे पालक यांना भेडसावणार आहे. परंपरागत डिग्री कोर्सेसऐवजी व्यवसाय शिक्षणाची वाट धरून आपला भविष्यकाळ उज्ज्वल कसा करता येईल याबाबत मार्गदर्शन म्हणून दोन लेख मुद्दाम या अंकात छापले आहेत. - संपादक***

## व्यवसाय शिक्षणाच्या नव्या दिशा

नवीन शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता १० वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी २५ टक्के विद्यार्थ्यांना 'व्यावसायिक शिक्षणा'कडे वळविण्यासाठी सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. शाळा आणि महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना दिले जाणारे पुस्तकी शिक्षण व्यवहारात सर्वांनाच उपयोगी पडत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना कौशल्याच्या आधारावर व्यवसाय शिक्षण देणे, ही आजच्या आधुनिक काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांने स्वतःची आवड आणि क्षमता लक्षात घेऊन दहावीनंतर काळजीपूर्वक अभ्यासक्रमाची निवड करणे आवश्यक आहे.

दहावी आणि बारावीनंतर बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थिनी कला, विज्ञान अथवा वाणिज्य शाखेत प्रवेश घेऊन पदवी मिळविण्याचा धोपटमार्ग स्वीकारताना दिसतात. पण सध्या सर्व क्षेत्रात अद्ययावत तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष कार्यानुभव यावर विशेष भर दिला जात आहे. पदवी अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते, पण नोकरी अथवा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यानुभव फार महत्त्वाचा ठरतो.

कुशल कामगारांची मागणी व पुरवठा यांचा समन्वय साधून व उच्च शिक्षणावरील भार कमी करून त्याला पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारने 'व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाद्वारे' केला आहे.

### प्रत्यक्ष कार्यानुभव व प्रशिक्षण

या 'व्यवसाय अभ्यासक्रमात' प्रत्यक्ष कार्यानुभव आणि प्रशिक्षण यावर विशेष भर देण्यात आला आहे. दोन वर्षांनंतर म्हणजे १२ वीत राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे परीक्षा घेण्यात येते आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांना 'प्रमाणपत्र' दिले जाते. **इतर शाखांतील बारावीच्या बरोबरचा दर्जा या व्यवसाय अभ्यासक्रमांना देण्यात आला आहे. त्यामुळे उच्च शिक्षणास जाण्याची संधीही उपलब्ध होत आहे.**

खाजगी आणि सरकारी क्षेत्रात उमेदवारांकडे अनुभवाची सातत्याने मागणी केली जाते. त्यामुळे व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार होण्याची शक्यता असते. प्रत्यक्ष कामाचे कौशल्य असल्याने ते पदवीधरांशी स्पर्धा करू शकतात.

### प्रवेशासाठी गुणांची अट नाही

अलिकडच्या काळात व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आकर्षण निर्माण होत आहे. दहावीला ६० ते ७० टक्के गुण मिळविणारे विद्यार्थीसुद्धा या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ लागले आहेत. ५० टक्क्यांहून कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम विशेष उपयुक्त ठरतील.

विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे **व्यवसाय अभ्यासक्रमांना प्रवेशासाठी गुणांची कोणतीही अट नाही.** राज्यात ३१ जिल्ह्यांमधून ११४० कनिष्ठ महाविद्यालयांतील व्यवसाय शिक्षण केंद्रामधून सुमारे ५८ हजार जागा उपलब्ध आहेत. मागणीनुसार नवनवीन अभ्यासक्रम पूर्ण करून, नोकरी / व्यवसाय करून, बाहेरून अभ्यास करून मुक्त विद्यापीठाची पदवी मिळविता येते. त्यामुळे व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम सर्व दृष्टीने उपयुक्त आहे.

### स्वयंरोजगार मार्गदर्शन

व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना सेवा क्षेत्रात छोटे स्वयंरोजगार स्थापन करण्यास फार मोठा वाव आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्थांतर्गत 'स्वयंरोजगार मार्गदर्शन कक्ष' स्थापन करण्यात येत आहेत. त्यामुळे बँका व वित्तीय संस्थाकडून अर्थसहाय्य तसेच प्रोजेक्ट रिपोर्ट इत्यादीबाबत व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना आवश्यक मदत सहज उपलब्ध होऊ शकेल.

व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संस्थांद्वारे व परिषदेतर्फे खाजगी उद्योगातील तंत्रज्ञ छोटे उद्योगपती, कारखानदार यांच्याशी थेट संपर्क साधण्यात येत आहे व त्यांची जिल्हा स्तरावर 'सल्लागार समन्वय समिती' स्थापन करण्यात येत आहे. विद्यार्थी आणि उद्योगांसंबंधीचे विविध क्षेत्रातील लोक यांच्यात सतत समन्वय निर्माण होण्यासाठी काही तज्ज्ञ लोकांची व्याख्याने आयोजित करण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्व समस्यांचे जागीच निराकरण होऊन त्यांच्यात आवश्यक आत्मविश्वास निर्माण होतो.

### निरनिराळे ३० अभ्यासक्रम

व्यवसाय शिक्षणासाठी ६ गटांमध्ये ३० वेगवेगळे व्यवसाय अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. १) वाणिज्य गट, २) मत्स्य गट, ३) शेती गट, ४) अर्ध वैद्यकीय गट, ५) यांत्रिक व इंजिनियरींग गट, ६) हॉटेल मॅनेजमेंट.

व्यवसाय अभ्यासक्रमांतील ३० पैकी पुढील **२३ अभ्यासक्रमांना 'अप्रेन्टीसशिप' उपलब्ध होत आहे.**

१) मेटेनन्स ॲण्ड रिपेअर्स ऑफ इलेक्ट्रीकल, डोमेस्टीक अप्लायन्सेस, २) बिल्डींग मेटेनन्स, ३) पर्चेस ॲण्ड स्टोअर किपिंग, ४) मार्केटिंग ॲण्ड



Marathe Pratishthan

सेल्समनशिप, ५) अकौंटींग अ‍ॅण्ड ऑडीटींग, ६) ऑफिस मॅनेजमेंट, ७) इन्शुरन्स, ८) बँकींग, ९) क्रॉप सायन्स, १०) डेअरी टेक्नॉलॉजी, ११) प्लँट प्रोटेक्शन, १२) पोल्ट्री प्रॉडक्शन, १३) सीड प्रॉडक्शन टेक्नॉलॉजी, १४) सेरीक्युलेटिव्ह, १५) अ‍ॅग्रीकल्चर केमिकल्स, १६) फिश प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी, १७) इनलँडफिशरीज, १८) मेडिकल लॅब टेक्निशियन, १९) एक्स् रे टेक्निशियन, २०) ऑपथेलीक टेक्निशियन, २१) क्रिच अ‍ॅण्ड प्रीस्कूल मॅनेजमेंट, २२) इन्स्टिट्यूशनल हाऊसकिपींग, २३) टुरीझम आणि ट्रॅव्हल टेक्निक्स्.

मुंबईसह राज्यातील ३१ जिल्ह्यात जिल्हा व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी कार्यरत आहेत. तसेच मुंबई, औरंगाबाद, अमरावती, पुणे, नागपूर आणि नाशिक या **सहा ठिकाणी उपसंचालक, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण याची प्रादेशिक कार्यालये आहेत.** या अभ्यासक्रमाबाबतची अधिक माहिती संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी आणि उपसंचालक यांच्याकडून मिळू शकेल. **उपसंचालक कार्यालयाचे पत्ते आणि त्यांचे दूरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत.**

**१) मुंबई विभाग :** ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१. दूरध्वनी क्रमांक : ६४२६३५४ / ६४२६३५५.

**२) औरंगाबाद विभाग** : भडकल गेट जवळ, औरंगाबाद, दूरध्वनी क्रमांक ३४९६२.

**३) अमरावती विभाग** : मोर्शी रोड, अमरावती ४४४६०३. दूरध्वनी क्र. : ७६५८८.

**४) पुणे विभाग** : घोले रोड, पुणे ४११००५. दूरध्वनी क्र.: :३२५४१५.

**५) नागपूर विभाग** : सिव्हील लाईन्स, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर ४४४००१. दूरध्वनी क्र. : ५३२५५५.

**६) नाशिक विभाग** : जुना मुंबई आग्रा रोड, नाशिक ४२२००२. दूरध्वनी क्र. : ७७२२०.

(आभार : सु. ना. जोशी, म. टा. दिशा पुरवणी जून १९७०)

***

प्रतिष्ठानच्या पुण्यातील कार्यकर्त्या सौ. नालांबरी मराठे, मानसतज्ञ, यांच्या **व्यकटेश मार्गदर्शन केंद्रातहि** निरनिराळ्या अभ्यासक्रमांबाबत माहिती व मार्गदर्शन मिळू शकेल.
**पत्ता :** आणा बळवंत चौक, प्राथमिक नृ. म. वि. समोर, पुणे ४११०३०. (फोन : ४५६२७०)

# २१ व्या शतकात येणारे नवीन व्यवसाय

***येत्या काही वर्षात कोणते विषय, कोणती क्षेत्रे पुढे येतील? कशाला महत्व प्राप्त होईल याचा अंदाज पालक व विद्यार्थ्यांना हवा, ज्यामुळे त्यांना त्यांच्या करीयरला आकार देता येईल. काही महत्वाची क्षेत्रे, त्यातील नवी क्षितिजे इत्यादि विषयातील मार्गदर्शन करणारा लेख.***

एकेकाळी पदवी ही नोकरीसाठी आवश्यक अशी पात्रता समजली जात असे. बदलत्या काळाबरोबर व्यावसायीकरण वाढल्याने नोकरी उद्योगात अधिकाधिक विशेषीकरणाची गरज भासू लागली आहे. त्यामुळे केवळ पदवी आणि नोकरी धंदा यांचा संबंध कमीकमी होत चालला आहे. म्हणून **कोणतीही पदवी मिळविताना तिचा आपल्या करिअरच्या दृष्टीने काय उपयोग होऊ शकेल याचा सखोल विचार करणे आवश्यक बनले आहे.** केवळ पारंपरिक पद्धतीने विद्यार्थ्यांनी विद्यार्जन न करता २१ व्या शतकात येणारे नवीन व्यवसाय/नवी आव्हाने असलेल्या नोकरी-व्यवसायाशी संबंधित असे वेगळे अभ्यासक्रम पूर्ण करणे, ही आता काळाची गरज बनली आहे. येत्या काही वर्षात कुठली क्षेत्रे अग्रेसर होतील, याचा अंदाज पालक व विद्यार्थ्यांना हवा. ज्यामुळे त्यांना त्यांच्या करीयरला आकार देता येईल.

## इलेक्ट्रॉनिक्स

विज्ञान विषयात झालेले संशोधन व त्याचे तंत्रज्ञानात होणारे रूपांतर यामुळे सर्वसामान्यांपर्यंत याचे फायदे पोचले आहेत. रेडिओपासून मायक्रोव्हेव ओवन पर्यंत सर्व वस्तूंकरिता इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान वापरले जात आहे. येत्या काही वर्षात Instrumentation Electronics (उपकरण शास्त्र) या विषयाला महत्व येणार आहे. रासायनिक उद्योग, शेती या क्षेत्रांमधील उपकरणे व त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी खास प्रयत्न करावे लागणार आहेत.

उपकरण शास्त्राचे महत्व ओळखून आता बी.एस्सी. च्या अभ्यासक्रमात वैद्यकीय उपकरणे, शेतीव्यवसायातील उपकरणे आणि ग्राहकोपयोगी उपकरणे असे तीन विषय ठेवण्यात आले आहेत.

अनेक संस्था ग्राहकोपयोगी उपकरणे दुरुस्त करण्यासाठी छोटे कोर्सेस चालवितात, परंतु विद्यार्थी तात्पुरती दुरुस्ती करायला शिकतात. अशा कोर्ससमुळे लहान प्रमाणावर स्वयंरोजगार उभा करता येतो परंतु संपूर्ण ज्ञान त्यांना नसल्यामुळे धंद्याचा विस्तार ते करू शकत नाहीत.

## अपारंपरिक उर्जा निर्मिती

सौर उर्जा, पवन उर्जा, भूगर्भातील उष्णता, समुद्रातील लाटा, भरती-ओहोटी यांचा उपयोग उर्जा निर्मितीसाठी करण्याची धडपड सर्वत्र चालू आहे. ह्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. ह्यातील तंत्रज्ञानाचा औद्योगिक क्षेत्र व शेतीक्षेत्रात उपयोग केला जात आहे. सौर उर्जेचा विचार केल्यास पृथ्वीवर पडणारी सौर उर्जा आपल्या गरजेपेक्षा हजारो पटीने अधिक आहे व याने प्रदूषण निर्मिती होत नाही.

इंधनाचा वापर करताना बऱ्याच प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारानी उर्जा वाया जात असते. वाया

Marathe Pratishthan

जाणाऱ्या उर्जेचा पुन्हा वापर करणे हे तंत्रज्ञान पाश्चिमात्य देशात विकसित होत आहे. म्हणून उर्जा व्यवस्थापन या विषयाला महत्व प्राप्त झाले आहे.

### बायोटेक्नॉलॉजी

'तिळा दार उघड' या प्रमाणे सध्या बायोटेक्नॉलॉजी हा परवलीचा शब्द झाला आहे. यातूनच आता उद्योग व्यवसायाच्या नव्या वाटा दिसू लागल्या आहेत. नोकऱ्यांसाठी नवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

इस्त्राइलने कृषिशास्त्रात बरीच प्रगती केली आहे. पॉलीहाऊसमध्ये भाजीपाला, फळभाज्या, फुले यांची लागवड करून कृषि उत्पादने ते परदेशी निर्यात करतात. इस्त्राईलच्या प्रगतीचे मुख्य कारण म्हणजे जिद्द आणि कल्पकता. इस्त्राईल बरोबर तुलना करता आपण अनेक बाबतीत नशीबवान आहोत. आपल्याकडे सूर्यप्रकाश, जमीन, पाणी आणि मनुष्यबळ भरपूर आहे. आपण त्याचा लाभ घेतला पाहिजे. त्यामुळे फ्लोरिकल्चर, हॉर्टिकल्चर, पॉलीहाऊस, ग्रीनहाऊस, बायोटेक्नॉलॉजी या दृष्टीने कामाला लागले पाहिजे.

बायॉलॉजी म्हणजे जीवशास्त्र. सजीवांच्या अभ्यासाचा विषय. सजीवांचा विशिष्ट तंत्रज्ञान वापरून उत्पादनासाठी उपयोग केला की बायॉलॉजी ह्या विषयाचे नामांतर होते 'बायोटेक्नॉलॉजी'. सूक्ष्मदर्शकाखाली दिसू शकणाऱ्या जिवाणूंपासून गाई, म्हशीसारख्या मोठ्या सजीवांचा जीवशास्त्रात समावेश होतो. यामुळेच सूक्ष्म जिवाणूंपासून औषध निर्मिती, जेनेटिक इंजिनियरिंगचे तंत्रज्ञान वापरून गाई, म्हशींमध्ये अधिक दूध उत्पादन क्षमतेची निर्मिती, वनस्पतींचे पोषण मूल्य वाढवणे, तसेच प्रतिकूल वातावरणात वाढू शकतील अशा रोपांची निर्मिती, अधिक प्रमाणात रेशीम मिळावे म्हणून रेशीम किड्यांमध्ये आणि लोकर उत्पादन वाढावे म्हणून मेंढीमध्ये हेतु पुरस्सर केले जाणारे बदल या सर्वांचा बायोटेक्नॉलॉजी मध्ये समावेश केलेला आहे.

यात आता टिश्यूकल्चरचा समावेश पण करण्यात आला आहे. टिश्यू कल्चरमध्ये कोंब, देश, पान, परागकण आणि इतर भागापासून रोपांची निर्मिती करण्यात यश मिळाले आहे. टिश्यू कल्चरच्या तंत्राने चीन आणि अमेरिकेतील संशोधकांनी भाताच्या सुधारित जाती तयार केल्या आहेत. ऊस, बटाटा, मका, गहू आणि टोमॅटोच्या काही बागांमध्ये अनुवंशिक बदल होऊन रोगप्रतिकारक शक्ती निर्माण झाली आहे. अशी पिके शेतकऱ्यांपर्यंत पोचली आहेत. जेनेटिक इंजिनिअरिंगमध्ये भारत विकसित राष्ट्रांपेक्षा १० वर्षांनी मागे आहे. जळगांव परिसरातील केळीच्या बागा आणि केरळमधील वेलदोड्यांचे मळे, व्हायरसमुळे नष्ट झाले होते. टिश्यू कल्चरचे तंत्र वापरून कोंबापासून व्हायरसमुक्त रोपे तयार करता येतात. त्याचे मायक्रो-प्रॉपगेशन करून अल्पावधीत हजारो रोपे तयार करतात. बटाटा, ऊस, केळी आणि वेलदोडा या पिकांमध्ये हे तंत्रज्ञान यशस्वी रीतीने वापरले गेले आहे.

बायोटेक्नॉलॉजीचा संपूर्ण उद्योग हा मायक्रोप्रॉपगेशन वर आधारलेला आहे. टिश्यू कल्चरला व्यापारी मूल्य आले आहे.

### संज्ञापन शास्त्र - (Information Technology)

आपल्या रोजच्या जीवनावर प्रसार माध्यमांचा प्रभाव असतो. प्रसार माध्यमे लोकांपर्यंत पोचविणारा दुवा म्हणजे संज्ञापन. लिखित माध्यम हे पत्रकारितेशी निगडित आहे. संपादकीय विभागात पत्रकारांची आवश्यकता तर आहेच. पण त्याच्या अनुषंगाने अनेक अभ्यासक्रम, छपाई माध्यमाशी संबंधित आहेत. यामध्ये प्रिंट टेक्नॉलॉजी मधील डिप्लोमा व पदवी अभ्यासक्रम तसेच त्यामधील तांत्रिक शिक्षण. त्याशिवाय त्या माध्यमाला गरज आहे चांगल्या चित्रकारांची. छायाचित्रकारांची त्याचबरोबर माध्यमाचे व्यवस्थापन करणाऱ्यांची.

दृक्-श्राव्य माध्यमाकरिता लेखक, सादरकर्ते, कलावंत तसेच पडद्यामागील रंगभूषा, वेशभूषा, लाईट, संकलन, संगीत हे करणाऱ्या व्यक्तींची गरज आहे. ह्याशिवाय ह्या माध्यमाशी निगडीत जाहिरात, लघुपट, संशोधनाकरिता देखील माणसे हवी आहेत.

'इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन'- दिल्ली, मुद्रा इन्स्टिट्यूट - अहमदाबाद, सेंट झेवियर्स - दिल्ली व कलकत्ता येथे हे शिक्षण दिले जाते.

संज्ञापन शास्त्र हे उमलते शास्त्र आहे. येथे साचेबंद अभ्यास नसतो. अभ्यासक्रमासाठी पुस्तके नसतात. कल्पक, क्रियाशील व कष्टाळू विद्यार्थीच या अभ्यासक्रमात तग धरू शकतात. जे विद्यार्थी ग्लॅमरमध्ये फसले जातात ते अयशस्वी होतात.

### व्यवस्थापन

जगातील व्यापार व व्यवहार हे माहिती क्षेत्रातील क्रांतिमुळे गतिमान झाले आहेत. त्यामुळे व्यवस्थापन शास्त्राला महत्व आले आहे. त्याकरता नवीन अभ्यासक्रम येत आहेत. त्याचा युवकांनी वेध घेतला पाहिजे.

हॉस्पिटल मॅनेजमेंट, हॉटेल मॅनेजमेंट, फॉरिन ट्रेड लॉज ह्या विषयांचे अभ्यासक्रम बरेच ठिकाणी सुरू झाले आहेत.

कॉम्प्युटर मॅनेजमेंट, परसोनेल मॅनेजमेंट, फायनानशियल मॅनेजमेंट अशा विषयांचे अनेक कोर्सेस उपलब्ध आहेत. सेवाक्षेत्रात होणाऱ्या बदलामुळे शिक्षण कुठल्या विद्यापीठातून घेतले जाते, याला महत्व राहणार नाही.

### कायदा

बदल्या काळाचे परिणाम म्हणून नवीन अभ्यासक्रमात पेटंट-ट्रेडमार्क-कॉपीराइटचे कायदे, पर्यावरण, ग्राहक हक्क ह्या विषयक कायदे अभ्यासात येणार आहेत.

पाश्चिमात्य देशात शैक्षणिक दर्जा कायदा शिक्षण कसे आहे यावर मोजला जातो. आपल्याला पण त्या दिशेने जावे लागणार आहे.

### करियर नियोजन

आजकाल करियर नियोजन हा परवलीचा शब्द झाला आहे. पाश्चिमात्य देशात एक वर्षाचे केलेले नियोजन हे समाधानकारक धरले जाते तर तीन वर्षाचे नियोजन हे दूरगामी धरतात. तेथे पाच वर्षाचे नियोजन केलेच जात नाही. कारण दरवर्षी नवीन करियर्स येतच असतात. आपण पण करियर नियोजन या धर्तीवरच करावयास हवे. अर्थव्यवस्थेत आणि माहिती व्यवस्थापनात होणारे बदल ह्यांचे सर्वत्र पडसाद उमटत आहेत.

(आभार : भालचंद्र बर्वे, सप्तर्षी, वर्ष २९, अंक २)

***



Marathi Pratishthan

भारतातील सामाजिक स्थित्यंतरे आणि विशेषतः महाराष्ट्रातील ब्राह्मण - ब्राह्मणेतर चळवळ यांच्या अभ्यासक

# अमेरिकन स्कॉलर मॉरीन एल्. पी. पॅटर्सन



*प्रतिष्ठानचे अमेरिकेतील 'राजदूत' श्री. भाऊसाहेब तथा वि. गो. यांचा या अमेरिकन स्कॉलर बाईंशी परिचय झाला. त्या बाईंचा चित्पावनांबाबत खास अभ्यास आहे. सुमारे ५० वर्षे त्यांचा या विषयाचा व्यासंग आहे. चित्पावनांच्या आत्तापर्यंत प्रसिद्ध झालेल्या सुमारे १०० कुलवृतांतापैकी ८० हून अधिक कुलवृत्तांत या बाईंच्या संग्रही आहेत. मराठे कुलवृतांत (पहिला आवृत्ती) वाचताना त्यांचा फोटो शेजारी छापला आहे. दुसरी आवृत्तीही नुकतीच त्यांना पाठवली आहे.*

*त्यांच्या विषयीची माहिती आणि त्यांना भावलेली चित्पावनांची आणि कुलवृतांताची वैशिष्ट्ये याबाबतचे भाऊसाहेबांना लिहिलेले त्यांचे पत्र सोबत छापले आहे.*

## *About Chitpavans*

Dear Bhausaheb,

I have been impresed by the way in which *Chitpavans* emerged from obscurity in Ratnagiri, barely 300 years ago and spread onto *Desh*. A substantial number appear to have succeeded as low-level administrators and worked up to become leaders-both civil and military, culminating in gaining the position of *Peshwa*.

They are characterised by their energy, industriouness, high intelligence and adaptibility. *Chitpavans* value education, both traditional and modern, and have produced outstanding leaders in Science, Technology as well as the Arts and Literature.

In Politics, *Chitpavans* have been leaders across the political spectrum - from advocates of violence to devotees of non-violence such as Vinoba Bhave. And *Chitpavans* have moved to all parts of India and further throughout the world. Their impact seems out of proportion to their small numbers.

My interest is in using the remarkable and highly unusual - *kulavrittanta* genre of historical studies to highlight the *Jati's* attempt to maintain its identity in the face of dispersal far from its original home in Konkan and Western Maharashtra. These books represent an amazing effort at maintaining identity and promoting communication across time and space. Other groups in India produce family histories but none in such a systematic, standarsised and organised way as the on-going effort of well over 100 *kulas* to depict their members.

The formation of a database and web-site by Raghunath Kelkar* will only serve to enhance this process of identity to increase communication and solidarity. This is another instance of *Chitpavan* leadership and ingenuity. ***

(* रघुनाथ शंकर केळकर, २५०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन : ०२१२-५३९३८८ यांनी सुमारे १०० कुलवृतांतातील माहितीचे संकलन करून इंटरनेटवर डेटाबेस निर्माण केला आहे - संपादक)

## *About Myself*

I spent nearly four years in India, 1944-46, on wartime U.S. government service, and then as an independent student of Hindi, in 1948. In early 1951 several eminent scholars from Poona came to Penn as visiting faculty. They were D.R. Gadgil and N.V. Sovani of Gokhale Institute, and the anthropologist Irawati Karve of the Deccan College. Professor Gadgil suggested that I study the Brahman-Non Brahman conflict in Maharashtra for my term paper in the course "Social conflict in India". He gave me Marathi articles on the subject, and I suddenly realized I needed to learn Marathi!

Since Marathi was not then taught at Penn, I persuaded the visiting N.V. Sovani to tutor me. My backgound in Hindi and Sanskrit was crucial and I soon began to read the Marathi documents. In addition to translating Marathi articles for a long paper on the Varkari cult of Pandharpur, I wrote my MA thesis on anti-Brahmanism in Maharashtra (SARS, 1952). I was the first Penn graduate student

*contd. page 16*

Marathe Pratishthan

to study Maharashtra and Marathi.

I went off to Poona in late 1953 to continue research on the anti-Brahman movement. I lived for a while with a Brahman family and spent nearly two years collecting materials and interviewing dozens of Brahman and Non-Brahman leaders in Poona, Satara and Kolhapur.

I gradually refined my focus from anti-Brahmanism to a study specifically of the Chitpavan Brahman caste, the main target of the growing Non-Brahman movement. Using the large number of published histories of Chitpavan Kulas, or families, I have written extensively on this caste.

I convened a conference in Chicago on "Patterns of change in 19th century Maharashtra" in 1969. During my years (1958 to 1984) as a faculty member at the University of Chicago I encouraged study on Maharashtra and Marathi.

- ***Maureen L. P. Patterson***
*97 Shattuck Road, Hadley, Massachusetts 01035*

---

## या अंकात

१. **तुम्ही काय निकाल द्याल?** ........................ पृ.१
प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश सखाराम
२. **आदर्श मातेचे मनोगत** ............................ पृ.१
राधाबाई बा. मराठे
३. **वसंत गौरव - ऋतु उत्सव** ........................ पृ.४
वि. के. मराठे
४. **साध्याही विषयांत आशय कधी, मोठा किती आढळे!** ... पृ.६
अनंत धोंडो खांबेटे
५. **उद्योजक सहाय्य योजना** ........................ पृ.७
६. **सौंदर्यप्रसाधनेतील पुरुषांचा वाटा** .................. पृ.८
सौ. सुनिता राजन
७. **मला आणखी आयुष्यात काय पाहिजे** ............ पृ.८
मुंबईच्या माजी नगरपाल उषाकिरण
८. **मी असा घडलो** ................................ पृ.९
कमलाकर अनंत जाईल
९. **सलवार कुडता व मराठी भगिनी** ................ पृ.१०
सौ. आशा वि. चक्रदेव
१०. **शोक (कविता)** ................................ पृ.१०
सौ. मृणाल दत्तात्रय खांबेटे
११. **'आयुर्वेद'विचार** ................................ पृ.११
वैद्य रामचंद्र शिवराम मराठे
१२. **१० वी व १२ वी नंतर पुढे काय?** .............. पृ.१२
सु. ना. जोशी, भालचंद्र बर्वे
१३. ***About Chitpavans & About Myself*** .............. पृ.१५
अमेरिकन स्कॉलर मॉरीन एल. पी. पॅटर्सन
याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३) आणि **प्रतिसाद** (पृ.७,९) ही नेहमीची सदरे.

**बुक पोस्ट**

**प्रति**

**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)

Marathe Pratishthan